जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 AUG 2025
पुण्यनगरी



कोल्हापूर : प्रख्यात हिंदी कवयित्री गगन गिल यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत मान्यवर.

# प्रख्यात हिंदी कवयित्री गगन गिल यांची विद्यापीठास सदिच्छा भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त प्रख्यात हिंदी साहित्यिक, कवयित्री गगन गिल यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. गिल या एका साहित्यिक कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रथमच कोल्हापूरला आल्या आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची भेट घेतली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाकडून प्रकाशित 'ऐसे थे हमारे शाहू महाराज' या पुस्तकाची प्रत देऊन त्यांचे स्वागत केले. श्रीमती गिल यांनी विद्यापीठासह कोल्हापुरातील साहित्यिक चळवळीविषयी जाणून घेतले. त्यानंतर त्यांनी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन त्यांना अभिवादन केले. हिंदी अधिविभागालाही त्यांनी सदिच्छा भेट देऊन तेथील शिक्षक, विद्यार्थ्यांशी अनौपचारिक संवाद साधला. तेथेही त्यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ परिसरात फिरून येथील जलसंवर्धन कामाची पाहणीही त्यांनी केली.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांच्यासह कवयित्री संजीवनी तडेगावकर, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. गीता दोडमणी, डॉ. सुषमा चौगुले, डॉ. प्रकाश निकम यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 AUG 2025

लोकसत्ता

# वनाधिकार कायदा आव्हान अन् सुवर्णसंधी - डॉ. माधव गाडगीळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : वनाधिकार कायद्याद्वारे जैवविविधतेचे सरंक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न होत आहे. नैसर्गिक संपत्तीचा टिकावू पद्धतीने वापर व त्याचा न्याय्य लाभ सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी वनाधिकार कायदा हे एक मोठे आव्हान आहे आणि त्याच बरोबर ती एक सुवर्णसंधी सुद्धा आहे, असे प्रतिपादन पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र व निसर्ग व मानवी संरक्षणासाठी मोहीम यांच्या वतीने पर्यावरण, जीवनमान आणि वनहक्क कायदे या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते ऑनलाईन उपस्थित राहून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.




राष्ट्रीय परिसंवादात बोलताना डॉ. प्रमोद पाटील. मंचावर डॉ. भारत पाटणकर, डॉ. के.जे. जॉय, अविनाश भाले.

डॉ. गाडगीळ म्हणाले, सहकारी ज्ञान व्यवस्थापनाद्वारे पर्यावरणाचे संरक्षण होण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, हवामानामुळे होणारे बदल समजून घेणे आवश्यक बनले आहे. अविनाश भाले यांनी स्वागत, डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

सुपेकॉमचे के. जे. जॉय, डॉ. भारत पाटणकर, एस. आर हिरेमठ, प्रदीप चव्हाण, विजय एदलाबादकर, सचिंद्र लेले, संपत देसाई, अविनाश भाले, अमोल वाघमारे, किरण लोहकरे, शैलश सावंत, नूतन माळवी, सुभाष डोळस धैर्यशील पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मांडणी केली.

2 8 AUG 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड थोर स्वातंत्र्यसेनानी

## ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रांतिअग्रणी कॉ. जी. डी. बापू लाड हे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा याच्या पलीकडे जाऊन मातृभूमीसाठी झगडणारे थोर स्वातंत्र्यसेनानी होते. आपला देश, आपली माणसे आणि एक समाजवादी स्वप्न घेऊन ते जगत होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड यांच्या नावे अध्यासन सुरू करण्यात आले. त्याच्या प्रारंभप्रसंगी 'भारतीय स्वातंत्र्य लढा आणि जी. डी. बापू लाड' या विषयावर ते बोलत होते.



**शिवाजी विद्यापीठात क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासन केंद्राच्या प्रारंभप्रसंगी बोलताना ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे.**

यावेळी आमदार अरुण लाड म्हणाले, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांनी केलेले कार्य, चळवळ समाजापर्यंत पोहोचले पाहिजे. त्यांच्या लढ्यातील वस्तुनिष्ठ इतिहास समाजापुढे आणावा, हा प्रमुख उद्देश अध्यासन केंद्राचा आहे. समाज हेच त्यांचे कुटुंब होते. स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिले. अन्याय, अत्याचार आणि दुष्ट प्रवृत्तींविरोधात ते नेहमी आक्रमक होते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड यांच्या कार्याचे क्षितिज खूप विस्तीर्ण आहे. ते समजावून घेण्यासाठी निश्चितपणे संशोधन झाले पाहिजे. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सरोज पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परियच करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नवनाथ गुंड यांनी आभार मानले. यावेळी सरपंच किरण लाड, व्यंकाप्पा भोसले, डॉ. अशोक चौसाळकर, माया पंडित नारकर, विश्वनाथ माळी, डॉ. जी. पी. माळी, माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे, शरद नावरे, प्राचार्य टी. एस. पाटील, पी. पी. कुंभार, आर. बी. पाटील, दिनकर पाटील, आर. जी. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 AUG 2025

पुढारी

# साहित्य अकादमी विजेत्या गगन गिल यांची विद्यापीठाला भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध हिंदी साहित्यिक व कवयित्री गगन गिल यांनी शिवाजी विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाने प्रकाशित केलेले 'ऐसे थे हमारे शाहू महाराज' हे पुस्तक देऊन त्यांचे स्वागत केले.

गिल यांनी कोल्हापुरातील साहित्यिक चळवळीसह विद्यापीठाच्या कार्याविषयी जाणून घेतले. हिंदी अधिविभागाला भेट देऊन त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यापीठ परिसरातील जलसंवर्धनाच्या कामाची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी कवयित्री संजीवनी तडेगावकर, हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. गीता दोडमणी, डॉ. सुषमा चौगुले, डॉ. प्रकाश निकम उपस्थित होते.